|| श्री गणेशाय नमः ||

हरि:ॐ

Astro • Puja • Vastu

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

## ज्योतिष आणि वास्तु सल्लागार


योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 95944 28749

निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 86524 02078


श्री सत्याम्बा
व्रतकथा

धनलाभ, ऐश्वर्य, पुत्रसंतति देणारे सर्व संकटनाशक व्रत



For Hariom Astrologers
Proprietor

# श्रीसत्याम्बा व्रतकथा

पूजाविधी आणि महात्म्य

-: संपादक : वि. के. फडके

व्रताविधी, व्रतकथा, मूळ संस्कृत श्लोकांसह सुबोध मराठी अनुवाद

किंमत : 30 रुपये

अक्षयविद्या प्रकाशन

॥ॐ॥

॥श्री गणेशाय नमः॥

॥श्रीसत्याम्बादेवतायै नमः॥

॥श्रीगुरुभ्यो नमः॥

# श्रीसत्याम्बा व्रत माहात्म्य

आमच्या हिंदू धर्मात विविध कारणांसाठी वेगवेगळी व्रतवैकल्ये सांगितलेली आहेत. ही व्रतवैकल्ये शुद्ध मनाने, पूर्ण श्रद्धेने व विधिपूर्वक केल्यास त्यांचे अपेक्षित फल मिळाल्याशिवाय रहात नाही.

श्रीसत्याम्बादेवीचे व्रतही या प्रकारे केल्यास व्रतकर्त्याचे सर्व मनोरथ निश्चितपणे पूर्ण होऊन त्याची प्राप्त संकटापासून मुक्तता होते व त्यास सुख, समाधान व आनंद यांची निश्चित प्राप्ती होते असा अनेक व्रतकर्त्यांचा रोकडा अनुभव आहे.





# सत्याम्बादेवी कोण ?

आता प्रथम वाचकांना श्रीसत्याम्बा देवीची थोडक्यात माहिती सांगणे आवश्यक आहे.

श्रीसत्याम्बा म्हणजे दुसरी तिसरी कुणी नसून जगन्माता दुर्गा किंवा जगदम्बाच होय. महर्षी व्यासांनी लिहिलेल्या 'देवी भागवत' पुराणात हिच्या पराक्रमाचे वर्णन वाचावयास मिळते. ईशशक्ती ही निर्गुण निराकार असली तरी भक्तांवरील प्रेमाखातर तिला सगुण रूपात साकार व्हावे लागते व आपल्या भक्तांना दर्शन देऊन त्यांचे मनोरथ पूर्ण करावे लागतात. ही शक्ती सगुण रूपात साकार झाल्यानंतर तिच्या प्रसन्नतेसाठी तिचे भक्त तिला सहस्रावधि नावे देऊन आपले तिच्याविषयीचे प्रेम प्रकट करीत असतात. श्रीदुर्गादेवी म्हणजेच श्रीसत्याम्बा, हिलाही अनंत नामे आहेत, तिची अनंत रूपे आहेत. तिचे गुणही अनंत आहेत.

ही देवी दुर्गा, चामुण्डा, वाराही, लक्ष्मी, विमला, बहुला, नित्या, वनदुर्गा, मातंगी, कालरात्री, कुमारी, शिवदूती, मधुकैटभन्त्री, सावित्री, परमेश्वरी, कात्यायनी, ब्रह्मवादिनी अशा विविध नावांनी ओळखली व आळवली जाते.

'श्रीसत्याम्बा' मधील 'सत्य' शद्ब हा ब्रह्मवाचक आहे. 'जे सतत असते तेच सत्य !' ईशशकती शिवाय दुसरे काहीच सत्य नाही. तर अम्बा

याचा अर्थ आई किंवा माता. देवी जगन्माता आहे. कारण तिच्या पासूनच अखिल ब्रह्मांडाची उत्पत्ति आहे. अशाप्रकारे 'सत्याम्बा' हा शद्ब निर्माण झाला. हीच श्रीसत्याम्बा महाकाली महालक्ष्मी आणि महासरस्वति असून वेगवेगळ्या कार्यासाठी तिने ही विविध रूपे धारण केलेली आहेत. हिचे स्मरण आणि पूजन अत्यंत पुण्यप्रद असून साधकांचे सर्व मनोरथ त्वरित पूर्ण करणारे असल्याने हिचे व्रत नियमाने करणे मनुष्यमात्राच्या हिताचे आहे.

## व्रत कसे करावे ?

श्रीसत्याम्बा व्रताचा विधि अतिशय सोपा आहे. हा व्रतविधी सूर्य संक्रांतीच्या दिवशी, म्हणजेच सूर्य ज्या दिवशी नव्या राशीत प्रवेश करतो त्या दिवशी किंवा अष्टमी पौर्णिमा, मंगळवार, शुक्रवार या दिवशी करावा. परंतु मन प्रसन्न असेल अशा अन्य दिवशीही करण्यास हरकत नाही.

त्या दिवशी पहाटे लवकर उठून स्नान वगैरे उरकावे व कायावाचा मनाने देवीचे स्मरण व पूजन करावे. व्रताचे फल त्वरित मिळण्यासाठी व्रतकर्त्याने शास्त्रात सांगितलेल्या यम-नियमांचे पालन करणे मात्र फार आवश्यक आहे. कारण त्यायोगेच मन शुद्ध होऊन त्या ईशशक्तीशी मनाने संबंध जोडणे लवकर साधते व त्या शक्तीची कृपाही त्वरित होते.





## पूजेचे साहित्य

या व्रतासाठी प्रथम केळीचे खांब, आंब्याची पाने, कलश, देवीची सुवर्णाची (वा अन्य धातूची) प्रतिमा. चौरंग, गहू किंवा तांदूळ, विड्याची पाने, सुपाऱ्या, खोबऱ्याची वाटी, बदाम, खारका, वस्त्र, उपवस्त्र, नारळ, हळद, कुंकू, बुक्का, गुलाल, कापूर, उदबत्ती, फुले, बेल, दुर्वा, पंचामृत, सुगंधी तेल आणि दक्षिणा इ. सामुग्री जमवावी.

## प्रसाद व महानैवेद्य

त्याचप्रमाणे प्रसाद व महानैवेद्यही तयार करावा. प्रसादासाठी खवा, तूप, साखर, रवा, केशर, बदाम, खिसमिस, वेलदोडे याची आवश्यकता असून प्रसादाचे साहित्य दिडीच्या प्रमाणात असावे.

महानैवेद्यात भात, भाज्या, कोशिंबिरी तसेच मुख्य खीर असावी. दुसऱ्या नैवेद्यासाठी केशरमिश्रित रव्याचे लाडू करावेत. (हा नैवेद्य अर्थातच सोवळ्यात तयार करावा.)

हा व्रतविधी संध्याकाळी करावयाचा असून त्यासाठी संध्याकाळ होण्यापूर्वी थोडावेळ अगोदर पतिपत्नींनी स्नान करून शुचिभूर्त व्हावे व पवित्र महावस्त्र नेसून शुद्ध केलेल्या आसनावर प्रसन्न चित्ताने विराजमान व्हावे. नंतर मंडप

तोरणांनी सुशोभित केलेल्या चौरंगावरील श्रीसत्याम्बेच्या सुवर्ण अथवा अन्य धातूच्या प्रतिमेची पूजा करावी.

प्रथम आचमन, प्राणायाम करून व देशकालाचे स्मरण करून संकल्पाचा उच्चार करावा. हा संकल्प पुढीप्रमाणे उच्चारावा ——

'ममात्मन: श्रुतिस्मृति पुरोणोक्त फलप्राप्त्यर्थं मम सहकुटुम्बस्य क्षेमस्थैर्यायुरारोग्यैश्वर्याभ्युदयार्थं मनोप्सितकामनासिद्ध्यर्थं (येथे कामनेचा उच्चार करावा.) श्रीसत्यांबाव्रतांगत्वेन यथासंपादितसामग्र्या श्रीमहाकाली महालक्ष्मी महासरस्वतीस्वरूपि श्रीसत्यांम्बामहादेवीपूजनं करिष्ये' ।

त्यानंतर सर्व व्रतकार्य निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी महागणपतीचे आवाहन करून पूजन करावे.

यानंतर पूजा विधी पुढे अतिशय सोप्या संस्कृत भाषेत दिला आहे. त्याप्रमाणे करावा व शेवटी कथा वाचन करून आरती करावी. तसेच प्रसाद व महानैवेद्याचा प्रसाद देवीला दाखवावा.

हे व्रत करणाऱ्या यजमानाने व त्याच्या पत्नीने संपूर्ण दिवस उपवास करावा व रात्री आरती नंतर ब्राह्मणांना दक्षिणा वगैरे देऊन आप्तजन व ब्राह्मण यांचेसह आनंदाने भोजन करावे. रात्रौ झोपण्यापूर्वी श्रीसत्याम्बा देवीचे अत्यंत श्रद्धायुक्त व शुद्ध अंत:करणाने स्मरण करावे.





या व्रताचे माहात्म्य स्वयं भगवान् शंकरांनी आपला पुत्र कार्तिकेय उर्फ षडानन यास सांगितले असून ते म्हणतात की, हे सत्याम्बाव्रत मनुष्याच्या सर्व इच्छा त्वरित पूर्ण करणारे असून कलियुगात खरोखरच महान् फल देणारे आहे.

या व्रताच्याच योगे प्रत्यक्ष शंकरही प्राप्त संकटातून मुक्त झाले. तसेच त्यांचा पुत्र षडानन यालाही असुरांबरोबरच्या युद्धात मोठा विजय प्राप्त झाला !

तसेच फार वर्षापूर्वी कांचीपुरात कौंडिण्य नावाचा एक ब्राह्मण रहात होता. तो अत्यंत दरिद्री असल्याने त्याची पत्नी त्यास नेहमी टाकून बोलत असे. त्यायोगे जीवनास कंटाळून तो ब्राह्मण जीव देण्यासाठी विहिरीपाशी गेला. परंतु पूर्वपुण्याईच्या योगे त्याचवेळी देवी सत्याम्बा तेथे प्रकट झाली व तिने त्यास आत्महत्त्येपासून परावृत्त करून सर्व मनोरथ पूर्ण करणारे असे श्रीसत्याम्बा व्रत करण्याचा उपदेश केला. त्या ब्राह्मणानेही तिच्या शब्दावर विश्वास ठेवून हे प्रभावी व्रत केले व त्यायोगे त्यास विपुल धनाची प्राप्ती होऊन त्याचा संसार सुखाचा झाला.

मागध देशाचा राजा सूर्यकेतू याच्यावर मालवराजा चाल करून आला. त्यामुळे सूर्यकेतू अतिशय चिंताक्रांत झाला. परंतु त्याच्या गुरूने त्यास

सत्याम्बाव्रत करण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे राजाने हे व्रत केले व त्यायोगे मालवराजाचा पराभव होऊन तो सूर्यकेतूस शरण आला.

या सूर्यकेतूच्याच राज्यात गुण्ड नावाचा एक शूद्र रहात होता, त्यास संतति नव्हती. तेव्हा त्यानेही सूर्यकेतूकडून या व्रताची माहिती मिळविली व ते व्रत सुरू केले. त्यायोगे त्यासही पुत्र झाला. परंतु पुढे व्रताचे विस्मरण झाल्यामुळे त्याच्यावर अनेक संकटे आली. तथापि योगायोगाने त्यास पुन्हा या व्रताचे स्मरण झाले व त्याची सर्व दुःखे नष्ट झाली व तो सुखासमाधानाने राहू लागला.

या व्रताचे माहात्म्य वर्णन करताना श्रीसूत शौनकादी ऋषींना सांगतात की, 'हे सत्याम्बाव्रत या लोकी मोठमोठ्या संकटांचा नाश करणारे असून पुत्र आणि धन देणारे आहे. तसेच हे व्रत करणाऱ्या मनुष्यास अंती मुक्ती मिळून तो सत्याम्बा लोकात जाऊन तेथे हजारो वर्षे आनंदाने कालक्रमणा करतो.'

या व्रताचे माहात्म्य असे आहे की या व्रताची नुसती कथा श्रवण करण्यानेही व्रत केल्याचे फल मनुष्याला प्राप्त होते !

(टिप :- ज्या वाचकांना संस्कृत वाचता येत नाही त्यांनी संस्कृत श्लोकाखाली दिलेला फक्त मराठी अर्थ भक्तिभावाने वाचला तरी त्यांना तेवढेच फल मिळेल.)

— वि.के.फडके





नमः ॥ मध्ये पानीयं स० । उत्तरापोशनं स० ॥ हस्तप्रक्षालनं स० । मुखप्रक्षालनं स० । करोद्वर्तनार्थे चन्दनं स० ॥ पूगीफलं महद्दिव्यं० श्रीसत्यां० नमः तांबूलं स० ॥ इदं फलं मया देवि० फलेन फलितं सर्वं त्रैलोक्यं सचराचरम । तस्मात्फलप्रदानेन सफलाश्च मनोरथाः । श्रीसत्या० नमः श्रीफलं सम० । हिरण्यगर्भस्थं० । श्रीसत्या० नमः दक्षिणां सम० । ॐ श्रिये जातः श्रियं आनिरियायं श्रियं वयो जरितृभ्यो ददाति ॥ श्रियं वसाना अमृतत्वमायन्भवन्ति सत्या समिथामितद्रौ । श्रियं एवैन तच्छ्रियामादधाति संततमृचा वषट्कृत्यं संतत्यै संधीयते प्रजया पशुभिर्य एवं वेद ॥ चन्द्रादित्यौ च धरणी विद्युदग्निस्तथैव च ॥ त्वमेव सर्वज्योतींषि आर्तिक्यं प्रतिगृह्यताम् ॥ दुर्गे दुर्घटवारी इ श्रीसत्या नमः महानीरांजनदीपं स ॥ कर्पूरपूरेण मनोहरेण सुवर्णपात्रोदरसंस्थितेन । प्रदीप्तभासा सह संगतेन नीराजनं त्वा जगदीशि कुर्वे ॥ श्रीसत्याम्बायै नमः ॥ कर्पूरार्तिक्यदीपं सम ॥ ॐ आर्द्रां यःकरिणीं यानि कानि च पापानि रक्षस्व परमेश्वरि । श्रीसत्या० नमः प्रदक्षिणां सम ॥ ॐ तां म आवहा नमः सर्वतिर्थायै जगदाधारहेतेवे । साष्टांगोऽयं प्रणामस्ते प्रयत्नेन मया कृतः ॥ नमोऽस्त्वनन्ताय । श्रीसत्या० नमः नमस्करोमि ॥ यः शुचिः विद्याबुद्धिधनैश्वर्यपुत्रपौत्रादिसंपदम् । पुष्पाञ्जलिप्रदानेन देहि मे ईप्सितं वरम् ॥ श्रीसत्या० नमः मन्त्रपुष्पांजलिं सम० ॥ प्रार्थना ॥ आवाहनं न जानामि० । मन्त्रहीनं० । अपराधसहस्त्राणि० । गतं पापं गतं

दु:खं० । रूपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि । पुत्रान्देहि सर्वान्कामांश्च देहि मे ॥ सर्व मङ्गल मांगल्ये० ॥ सिद्धिदा बुद्धिदा नित्या सत्यमार्गप्रवर्तिनी । कम्बुग्रीवा वसुमती छत्र-छायाकृतालया ॥ घण्टाशूलहलानि शङ्खमुसले चक्रं धनु: सोयकं । हस्ताब्जैदधती घनान्तविलसच्छीतांशुतुल्यप्रभाम् ॥ गौरीदेहसमुद्भवां त्रिनयनामाधारभूतां महापूर्वामत्र सरस्वतीमनुभजेच्छुम्भादिदैत्यार्दिनीम् ॥१॥ इति प्रार्थनां कृत्वा कथां श्रृणुयात् ॥

ततो गन्धाद्यैरूपचारैरूत्तरपूजां कृत्वा । यस्य स्मृत्या अनेन गन्धपुष्पधूपदीपनैवेद्य फलताम्बूलदक्षिणाप्रदक्षिणानमस्कारै: कृतेन सपरिवारश्रीसत्याम्बापूजनेन कथाश्रवणेन च कर्मणा श्रीसत्याम्बादेवता प्रीयतां न मम ॥ कथाश्रवणसाङ्गतासिद्धचर्थं सरस्वतीपूजनं व्यासपूजनं च करिष्ये ॥ श्रीसत्याम्बाव्रतकर्मसाङ्गतासिद्ध्यर्थं ब्राह्मणपूजनं तीर्थं प्रसादं च गृण्हीयात् ॥ पादोदकं च सत्याया भक्त्या य: पिबते नर: । यत्तस्यान्तर्गतं पापं तन्नश्यति न संशय: ॥ सत्याम्बाया: प्रसादं तु गृहीत्वा भक्तिभावत: । सर्वान्कामानवाप्नोति प्रेत्य सायुज्यमाप्नुयात् ॥ श्रीसत्याम्बादेवतार्पणमस्तु ॥

॥ इति श्रीसत्याम्बाव्रतपूजाविधी: समाप्त: ॥ श्री: ॥



॥ ॐ ॥

# ॥ अथ सार्थ सत्याम्बाव्रतकथा प्रारम्भ: ॥

॥ श्रीगणेशाय नम: ॥ श्रीसरस्वतै नम: ॥ श्रीगुरवे नम: ॥ नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् । देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ॥ सर्वे श्रोतारा: सावधाना भवन्तु ॥

श्रीव्यास म्हणतात - एके काळी नैमिषारण्यात शौनकादिक ऋषि कथा ऐकण्याविषयीं उत्सुक होऊन अतिशय पुरातन असा जो 'सूत' त्यास विचारू लागले ॥१॥ अहो, वक्त्यांमध्ये श्रेष्ठ,

**व्यास उवाच ॥ एकदा नैमिषारण्य ऋषय: शौनकादय: ॥ पप्रच्छु: श्रवणाल्हादात्सूतं पौराणिकं खलु ॥१॥ भो भो:सूत महाप्राज्ञ वक्तृणामवतंसक ॥ भवद्वाणीप्रवाहेण चायुष्य निश्चितं हि न: ॥२॥**

महाबुद्धिमन् सूत महर्षे, तुमच्या वाणीरूपी प्रवाहाच्या योगे आमचे आयुष्य निश्चयेकरून सफल झाले आहे. ॥२॥ म्हणून आम्ही आता तुमची प्रार्थना करितो की, कोणत्या व्रताने अथवा तपाने इच्छिलेले फळ प्राप्त होईल, तें आम्हास कथन

करा ॥३॥ अहो सूत, कृपा करून आता कलीमध्ये लवकर फल देणारे असे जे व्रत अथवा तप असेल, त्याचे सार काढून ते आम्हांस सांगा ॥४॥ सूत

**तस्माद्वयं प्रार्थयामोऽधुना त्वां वद निश्चितम् ॥ केन व्रतेन तपसा प्राप्यते वांच्छितं फलम् ॥३॥ कृपा कृत्वाऽधुनाऽऽयुष्मन्फलदं वा व्रतं तपः ॥ सारं निष्काम्य वद नः कलौ शीघ्रफलप्रदम् ॥४॥ सूत उवाच श्रृणुध्वमृषयः सर्वे सत्याम्बाव्रतमुत्तमम् ॥ नदीनां च यथा गंगा मानवानां द्विजो यथा ॥५॥ तथा व्रतसमूहानां सत्याम्बाव्रतमुत्तमम् ॥ पुरा शिवः सुपृष्टोऽसौ षण्मुखेनैव संकटे ॥६॥**

म्हणतात - हे ऋषींनो, उत्तम असे सत्याम्बाव्रत ऐका. नद्यांमध्ये ज्याप्रमाणे गंगा अथवा मनुष्यांमध्ये ज्याप्रमाणे ब्राह्मण, ॥५॥ त्याप्रमाणे व्रतसमुदायांत उत्तम असे सत्याम्बाव्रत आहे. पूर्वी संकटाचे वेळी कार्तिकेय स्वामीने शंकरास असाच प्रश्न केला होता. ॥६॥ देव व दैत्य ह्यांच्या युद्धामध्ये मोठे संकट प्राप्त झाले असता अत्यंत व्याकूळ होऊन (कार्तिकेय स्वामीने) आपल्या पित्यास-शंकरास विचारिलें. ॥७॥ षडानन म्हणतात - हे भक्तावर दया करणाऱ्या कृपासागरा



महादेवा, अत्यंत कठीण अशा या संकटापासून माझे रक्षण करा. ॥८॥ ह्या बालकावर दया करून (अतिशय) त्वरित फल देणारे असे एखादे व्रत (मला) सांगा.

**देवदानवयुद्धेषु महासङ्कटमाप्तवान् ॥ अतीव व्याकुलो भूत्वा पितरं पर्यपृच्छत ॥७॥ षडानन उवाच ॥ देवदेव महादेव भक्तानुग्रहकारक ॥ त्राहि त्राहि कृपासिन्धो संकटादतिदुस्तरात् ॥८॥ बालोपरि कृपां कृत्वा वद शीघ्रं फलप्रदम् ॥ शिव उवाच ॥ एकाग्रमनसा पुत्र श्रृणुष्व फलदं व्रतम् ॥९॥ पुरा त्रिपुरदाहे च संकटं प्राप्तवानहम् ॥ जनान्सर्वान्विलोक्यार्थं क्षीणपुण्यांश्च दुर्भगान ॥१०॥**

श्रीशिव म्हणतात - हे मुला, शीघ्र फल देणारे असे व्रत मी सांगतो, ते एकाग्र चित्ताने ऐक ॥९॥ पूर्वी त्रिपुरासुराच्या वधाचे वेळी मजवर असेच संकट आले होते. ज्यांचे पुण्य थोडे आहे असे दुर्दैवी लोक पाहून ॥१०॥ तसेच अति दुःखामुळे पीडलेले, अल्पायुषी, नीच कुळात उत्पन्न झालेले असे लोक पाहून मी अगदी व्याकुळ झालो होतो. तेव्हा आकाशवाणी झाली. ॥११॥ आकाशवाणी

म्हणाली - हे शंभो, माझे भाषण ऐक, म्हणजे तू संकटापासून मुक्त होशील. सत्यांबेच्या कृपेने तुझे कल्याण होईल.॥१२॥

अतिक्लेशेन संत्रस्तान्क्षीणायुष्यान्कुयोनिजान् ॥ अतिव्याकुलचित्तोऽहं तदा खाद्वाण्यजायत् ॥११॥ आकाशवाण्युवाच । हे शम्भो शृणु मद्वाक्यं सङ्कटाद्वितरिष्यसि ॥ सत्यम्बायाः प्रसादेन कल्याणं ते भविष्यति ॥१२॥ इति श्रुत्वा मया तत्र सत्याम्बाव्रतमुत्तमम् ॥ मनसा ध्यानमात्रेण सर्वं ज्ञात्वा मया कृतम् ॥१३॥ तदेवाहं प्रवक्ष्यामि शृणुष्वैकाग्रमानसः ॥ सत्या भगवती देवी सा पूज्या संक्रमे

असे मी तेथे ऐकून ते उत्तम सत्यांबाव्रत मनाने-ध्यान करून सर्व काही जाणले व त्याप्रमाणे ते व्रत केले ॥१३॥ तेच मी तुला सांगतो, तू एकाग्र चित्ताने ऐक. ती सत्यांबा देवी सूर्यसंक्रांतीचे दिवशी पुजावी. ॥१४॥ अथवा अष्टमी, पौर्णिमा, मंगळवार, शुक्रवार ह्या दिवशी, अथवा ज्या दिवशी मनात उल्हास येईल त्या दिवशी प्रदोष काळी तिचे पूजन करावे. ॥१५॥ स्वस्तिवाचनपूर्वक







गणेश व वरूण ह्यांची पूजा करून आणि पीठपूजा करून यथासांग देवीची स्थापना करावी. ॥१६॥ मोठ्या भक्तीने ब्राह्मण, बंधु, इष्टमित्र वगैरे सह गंध, पुष्प, अक्षता, धूप, दीप आणि दुर्वा यांच्या सहाय्याने देवीची

दिने ॥१४॥ अष्टम्यां भौमवारे च पूर्णिमायां भृगोर्दिने ॥ यदा वा मानसोल्लासः प्रदोषे पूजनं तदा ॥१५॥ स्वस्तिवाचनपूर्वं तु गणेशं वरूणं तथा ॥ पीठपूजां विधायाथ साङ्गोपाङ्गा च स्थापयेत् ॥१६॥ ब्राह्मणैर्बन्धुवर्गैश्च भक्तिभावसमन्वितः ॥ गंधपुष्पाक्षतैर्दूर्वाधूपदीपैश्च पूजयेत् ॥१७॥ नैवेद्यं भक्तितो दद्यात्सार्धंप्रस्थैः प्रयत्नतः । शुद्धाग्नौ पक्वगोदुग्धं घट्टितं घृतशर्करा ॥१८॥

पूजा करावी. ॥१७॥ भक्तीने नैवेद्य अर्पण करावा. शुद्ध अग्नीवर आटविलेले दूध, खवा, तूप, साखर, ॥१८॥ चांगल्या गव्हाचे पीठ (रवा), ही सर्व प्रत्येकी दीड शेर घेऊन ती एकत्र करून त्यात थोडे केशर घालून उत्तम प्रकारचे

लाडू करावे. (हा एक नैवेद्य प्रसाद करावा.) ॥१९॥ (आणि दुसरा नैवेद्य) साखर घालून खीर करावी. याप्रमाणे दोन पदार्थांचा नैवेद्य देवीस अर्पण करावा आणि सत्यांबेविषयी भक्ति धरून मित्र व आप्त ह्यासह ॥२०॥ कथा श्रवण करून ब्राह्मणास दक्षिणा द्यावी. आणि यंत्राची,

**शुद्धगोधूमचूर्णं च सार्धप्रस्थमितं तथा । किञ्चित् काश्मीरसंस्कारं कृत्वा कुर्यात्सुलड्डुकात् ॥१९॥ पायसं सितया मिश्रं देव्यै नैवेद्यमर्पयेत् ॥ सत्याम्बाभक्तिसम्पन्नौ मित्रैर्बन्धुगणैः सह ॥२०॥ कथां श्रुत्वा जनैः सार्धं दद्यात्विप्राय दक्षिणाम् ॥ यन्त्रं वा प्रतिमा पूज्या स्वर्णरौप्यायसी मता ॥२१॥ सर्वेभ्यस्तं प्रसादं च दत्वाऽद्यच्च स्वयं ततः ॥ ततश्च स्वजनैः साकं ब्राह्मणान्प्रति भोजयेत् ॥२२॥**

सोन्याची अगर रूप्याची प्रतिमा करून तिची पूजा करावी. ॥२१॥ सर्वांस प्रसाद देऊन स्वतःही घ्यावा. नंतर आप्तजन व ब्राह्मण ह्यास भोजन द्यावे व आपणही भोजन करावे ॥२२॥ गाणे, नाचणे, (गीत नृत्य) वगैरे करवून नेहमी सत्यांबादेवीचे स्मरण करावे; नंतर देवीचे मंदिरात पूजा केली असेल तर ते मंदिर सोडून





घरी जावे ॥२३॥ शंकर म्हणतात, 'हे षडानना, हे सत्यांबाव्रत त्वरित इच्छा पुरविणारे आहे. मुला, कलियुगात महत् (मोठे) फळ देणारा हा लहानसा उपाय आहे. ॥२४॥ ज्या दिवशी व्रत करण्याविषयी मनुष्य संकल्प करील, त्या दिवशी

**गीतं नृत्यादिकं कृत्वा सत्याम्बां तु सदा स्मरेत् ॥ अम्बालये पूजनं चेत्ततश्च स्वगृहं व्रजेत् ॥२३॥ एतद्व्रतं त्वम्बिकाया वाञ्छापूर्तिकरं परम् ॥ अयं कलियुगे पुत्र लघूपायः फलप्रदः ॥२४॥ यस्मिन्दिने व्रतारम्भसंकल्पं कारयेद् बुधः ॥ प्रातराराभ्य सायान्हं समुपोष्य समाहितः ॥ कायेन मनसा वाचा सत्याम्बाभक्तितत्परः ॥२५॥**

सकाळपासून संध्याकाळपर्यंत उपोषण करून त्याने एकाग्रचित्त व्हावे, आणि कायावाचामनेकरून श्रीसत्यांबादेवीच्या भक्तीविषयीं तत्पर असावे.

॥ इति श्रीभविष्योत्तरपुराणे शिवषण्मुखसंवादे सत्याम्बाव्रतकथायां प्रथमोऽध्यायः ॥१॥

## अध्याय दुसरा

सूत म्हणतात, 'हे ब्राह्मणांनो पूर्वी हे सत्यांबाव्रत कोणी कसे केले हे सर्व मी सांगतो, तुम्ही भक्तियुक्त अंतःकरणाने ते ऐका ॥१॥ पूर्वी कांचीपुरातील एक अगदी गरीब व भुकेने पीडलेला असा ब्राह्मण नित्य पृथ्वीवर (भिक्षेकरिता) फिरत असे. ॥२॥

**सूत उवाच । एतद्व्रतं तु सत्यायाः पुरा येन कृतं द्विजाः । तत्सर्वं कथयिष्यामि शृणुध्वं भक्तिमानसाः ॥१॥ पुरा काञ्ची पुरे विप्रो निर्धनः क्षुत्प्रपीडितः । अहन्यहनि दीनोऽसौ पृथिव्यां संचचार ह ॥२॥ स एकदा बहिर्यातो भिक्षार्थं चाभ्रमन्महीम् ॥ प्रातरारभ्य माध्यान्हं यावत्प्राप्त न किञ्चन ॥३॥ तदा खिन्नमना भूत्वाऽऽगतः स्वसदनं प्रति ॥ तत्पत्न्या दृष्टिमात्रेण धिक्कृतो दूरतस्तथा ॥४॥**

एकदा तो घराबाहेर पडून भिक्षेकरिता पृथ्वीवर फिरू लागला. सकाळपासून मध्यान्हापर्यंत फिरला तरी त्यास काही मिळाले नाही. ॥३॥ त्यामुळे तो खिन्न होऊन परत आपल्या घरी आला तेव्हा त्याच्या पत्नीने दुरूनच धिक्कारयुक्त मुद्रेने त्याजकडे





पाहिले ॥४॥ आणि म्हणाली 'अरे मूर्खा, आज संक्रांतीचा दिवस आहे हे तुला माहित नाही काय ? मी काय करावे ? असले सौभाग्य नसले तरी चालेल ॥५॥ माझ्या बापाने जातक वगैरे चांगले विधिपूर्वक पाहिले नाही ! जा, जा ! पुन्हा

**न ज्ञातं रे त्वया मूढ चाद्य संक्रमणं दिनम् ॥ मया किं नु प्रकर्तव्यं सौभाग्यं मास्तु सर्वथा ॥५॥ मत्पिता जातकं स्पष्टं न दृष्टं विधिपूर्वकम् ॥ गच्छ गच्छ किमायासि निर्लज्जोऽसि पुनः पुनः ॥६॥ यत्र ते प्राप्यते चान्नं तत्र याहि सुखेन वै ॥ तस्या वाक्येन विप्रोऽसौ निरगच्छद् गृहाद्बहिः ॥७॥ ग्रामाद्योजनमात्रं तु गतो दैवबलेन सः ॥ तत्रैकां वापिका दृष्ट्वा विचारं कृतवांस्तदा ॥८॥**

पुन्हा निर्लज्जासारखा कशाला येतोस ? ॥६॥ जिकडे तुला अन्न (भिक्षा) मिळेल तिकडे तू खुशाल जा.' असे तिचे भाषण ऐकून तो ब्राह्मण घराबाहेर पडला ॥७॥ गावापासून चार कोस तो गेला. तिथे एक विहीर पाहून (तेथे) तो विचार करू लागला की, ॥८॥ ही विहीर फार मोठी आहे व हिच्यात पाणीही खूप

आहे. तर आपण प्रयत्न करून हिच्यांत खरोखर जीव द्यावा ॥९॥ मी जिवंत राहून काय उपयोग अथवा फायदा आहे ? स्वतःच्या स्त्रीने देखील धिक्कार केला, त्या अर्थी मी आता जीव देतो. ॥१०॥ असा निश्चय करून त्या ब्राह्मणाने

**इयं वापी विशालाऽस्ति उदकं वर्तते बहु ॥ तस्मात्सर्वप्रयत्नेन प्राणांस्त्यक्ष्यामि निश्चितम् ॥९॥ कोऽर्थो म जीवितेनाद्य को लाभो जीवितेन मे ॥ स्वपत्न्या धिक्कृतो यस्मात्तस्मात्प्रणांस्त्यजाम्यहम् ।-।१०॥ इति निश्र्ययमापन्नो महान्तमुपलं द्विजः ॥ तदा कटयां स्ववस्त्रेण बद्धा हस्तेन चौद्यतः ॥११॥ वाप्यां तु पतमानं तं सत्या तत्पार्श्वगाऽब्रवीत् ॥ रे वत्स किं करोषि त्वं किमर्थं दुःखितो**

मोठ्या प्रयत्नाने एक मोठा दगड आणून तो वस्त्रात बांधून ते वस्त्र आपल्या कमरेस बांधिले ॥११॥ तो उडी टाकणार इतक्यात त्याच्या मागे श्रीसत्यांबा देवी येऊन म्हणाली, 'अरे मुला, तू हे काय करितोस ? तू का दुःखित झालास ? ॥१२॥ दुःखाचा नाश होण्यास उपाय आहे (तेव्हा) विचार करून धैर्य धर.'' असे आपल्या पाठीमागे झालेले भाषण ऐकून तो मागे पाहू लागला. ॥१३॥ पूर्ण




विद्युल्लतेप्रमाणे दैदीप्यमान व श्यामवर्ण, वस्त्र व अलंकार ह्यांनी युक्त अशी देवी पाहून तो अगदी आश्चर्यचकित झाला. ॥१४॥ आणि म्हणाला—— हे महामाये, योग्यांच्या अधिदेवते, देवी, तुला नमस्कार असो. तू सर्व काही जाणत

**भवान् ॥१२॥ दुःखनाश उपायोऽस्ति धैर्यं कुरु विचारतः ॥ पृष्ठदेशे तदा वाक्यं श्रुत्वा पश्चाद्ददर्श सः ॥१३॥ यथा विद्युल्लता पूर्णा देवी श्यामाऽतिसुन्दरा ॥ वस्त्राभरणसंयुक्तां तां दृष्ट्वाऽश्चर्यमाप्तवान् ।-।१४॥ नमो देवि महामाये लते योगिन्यधीश्वरि ॥ मातस्त्वं .सर्व हि वदोपायं विनिश्चितम् ॥१५॥ देव्युवाच ॥ कौण्डिन्य शृणु मे वाक्यं व्रतं चर यथाविधि ॥ सत्याराथनमात्रेण फलं स्याद् भुवि**

आहेस तर मला निश्चित असा उपाय सांग. ॥१५॥ देवी म्हणाली, 'माझे भाषण ऐक व त्याप्रमाणे यथाविधि व्रत कर. सत्येचे आराधन केले असता पृथ्वीवर दुर्लभ असे फळ तुला मिळेल. ॥१६॥ आणि तुझे दुःख तत्काळ नाहीसे होईल.

श्री सत्याम्बा व्रतकथा

व पुत्र, नातु, धन इत्यादि प्राप्त होईल. कौंडिन्य म्हणाला, 'हे व्रत जर फलदायक आहे तर त्याचा निश्चित विधि सांगा.' ॥१७॥ त्याचे भाषण ऐकून मोठ्या आनंदाने देवीने त्यास विधि सांगितला व त्याच्याकडे कृपादृष्टीने पाहून नंतर ती गुप्त झाली ॥१८॥ त्यानें चोहोकडे नजर फेकली. त्यास (कोणी न दिसल्याने)

**दुर्लभम् ॥१६॥ सद्यो दुःखस्य हानिः स्यात्पुत्रपौत्रधनादिकम् ॥ कौण्डिन्य उवाच ॥ फलदं चास्ति चेत्तर्हि विधिं वद सुनिश्चितम् ॥१७॥ तद्वाक्यश्रवणाल्हादा विधिं चोक्त्वाऽतिसत्वरम् ॥ कृपादृष्ट्याऽवलो-क्यार्थ तत्रैवान्तरधीयत ॥१८॥ तदा स दृष्टिमात्रेण सर्वतश्चावलोकयत् - ॥ तदा विनिश्चितं तेन देवीयमवदत्स्वयम् ॥१९॥ अतो व्रतं करिष्यामि दुःखनाशो भवेद् ध्रूवम् ॥ इति कृत्वा मतिं तत्र तदा स**

वाटले की, श्रीदेवीच हे इतके स्वतः बोलली. ॥१९॥ म्हणून मी आता हे व्रत करीन; म्हणजे खात्रीने माझे दुःख नाहीसे होईल. असा विचार करून तो घराकडे परत जाण्यास निघाला ॥२०॥ नंतर तो ब्राह्मण गावातील धनिक





लोकांच्या वस्तीच्या मार्गातून जाऊ लागला. तेव्हा दैवयोगाने त्यास पुष्कळ धन मिळाले. ॥२१॥ त्या पैशातून सर्व प्रकारचे सामान यत्नानें आणून मोठ्या हर्षाने तो आपल्या घराकडे आला. ॥२२॥ (तेव्हा) त्याच्या स्त्रीने मोठ्या आनंदाने

**गतावान्गृहम् ॥२०॥ तदा ग्रामे प्रवेशं नु धनिवीथ्यां द्विजोऽकरोत् ॥ तदा दैवबलेनासो प्राप्तवान्विपुलं धनम् ॥२१॥ द्रव्यव्ययेन सम्भारं सर्वं संपाद्य यत्नतः ॥ स्वगृहे गमनं हर्षाद्विप्रोऽसौ कृतवांस्तदा ॥२२॥ तत्पत्न्या बहुहर्षाद्वै भारो नीतस्तदा गृहे ॥ सर्वं धनेन साध्यं स्यान्मृतस्तु धनहीनकः ॥२२॥ विचारमेवं कृत्वा स पत्न्यै वसनमब्रवीत् ॥ हे पत्नि शृणु मद्वाक्यं व्रतं कुर्वे त्वया सह ॥२४॥**

ते ओझे तेव्हा घरांत नेलें. 'सर्व कांही पैशानें साध्य आहे; धनहीन हा मेलेलाच समजावा' ॥२३॥ असा विचार करून तो स्त्रीस म्हणाला, 'अग ऐक. आज मी व तू मिळून एक व्रत करू' (असे म्हणून) ॥२४॥ त्याने धर्मवृद्धि करणारे

हे सत्यांबाव्रत लगेचच आरंभिले आणि त्याने पत्नीस आज्ञा करून ते चांगल्या रीतीने शेवटास नेले. ते असे :- ॥२५॥ त्या स्त्रीने सौभाग्यवायने देऊन उत्तम प्रकारचा स्वयंपाक केला आणि मग त्याने ब्राह्मण व आप्तजन यासह व्रतास आरंभ केला. ॥२६॥ व आणलेल्या सामानाने तो पत्नीसह पूजा करिता झाला; नंतर कथा श्रवण करून सर्वांनी उपाध्यायाची पूजा केली. ॥२७॥

**सत्यांबाया व्रतं शीघ्रमाचरद्धर्मवर्द्धकम् ॥ आज्ञापिता तदा पत्नी सा व्रतं समपादयत ॥२५॥ सौभाग्यवायनं दत्त्वा स्वादु पाकं चकार सा ॥ ब्राह्मणैर्बन्धुवर्गैश्च व्रतारंम्भं द्विजोऽकरोत् ॥२६॥ संभारेणैव तां पूजां कृतवान्भार्यया सह ॥ ततः श्रुत्वा कथां सर्वैः पुरोहितमपूजयत् ॥२७॥ तदाऽऽकाशादभूद्वाणी कल्याणं ते भविष्याति ॥ तदा प्रसादं सर्वेषामात्मने च स दत्तवान् ॥२८॥**

तेव्हां आकाशवाणी झाली की, 'तुझे कल्याण होईल.' त्यानंतर सर्वांना प्रसाद देऊन त्याने स्वतःही तो ग्रहण केला. ॥२८॥ नंतर स्त्री व आप्तजन ह्यासह त्याने भोजन केले. या व्रताच्या प्रभावाने त्यास पुत्रपौत्रादिक सर्व प्राप्त झाले. ॥२९॥




हे सर्व त्यास प्रयत्नावाचून, सत्याम्बादेवीचे कृपेने प्राप्त झाले, सूत म्हणतात — ह्याप्रमाणे शंकराने षडाननास मोठ्या भक्तीने हे व्रत सांगितले ॥३०॥ आणि तेव्हापासून मनुष्यास सुख देणारे असे हे व्रत प्रगट झाले, आणि तेच मी तुम्हाला सांगितले. दुसरे काय

**भोजनं तु तदा सर्वैः कृतवान् भार्यया सह ॥ तद्व्रतस्य प्रभावेण पुत्रादिकमवाप्तवान् ॥२९॥ सत्याम्बायाः प्रसादेन विना यत्नाद्द्विजोत्त-मः॥ सूत उवाच ॥ एतच्छिवेन पुत्राय व्रतमुक्तं सुभक्तितः ॥३०॥ तस्माच्च प्रकटं जातं सुखदं फलदं नृणाम् ॥एतद्वः कथितं विप्राः किमन्यत्कथयामि वः ॥३१॥ तदापि षण्मुखेनैव कृतं प्राप्तं फलं बहु ॥ कथायाः श्रवणेनैव प्रसाद ग्रहणेन च ॥३२॥**

सांगावे? ॥३१॥ तेव्हा षण्मुखाने देखील ते व्रत केले व कथा श्रवण करून प्रसाद घेतला त्यामुळे त्यास पुष्कळ फळ मिळाले ॥३२॥ व्रत करणाऱ्यास फळ

त्यामुळे तो नेहमी आनंदात मग्न असून देवीच्या भक्तिविषयी तत्पर असे. ॥५॥ त्याने नगरांत एक देवालय बांधले. तेथे अनेक प्रकारचा दानधर्म करून तो नेहमी गरिबांचे पालन करीत असे ॥६॥ त्याचा वडील मुलगा अर्ककेतु नावाचा असून

**तस्या देव्याः प्रसादेन तस्य पुत्रशतं त्वभूत् ॥ आनन्दाब्धौ सदा मग्नो देवीपूजनतत्परः ॥५॥ पुरे देवालयं कृत्वा तत्र दानान्यनेकशः ॥ दीनानां पालनं नित्यं करोत्येवं सदा भुवि ॥६॥ तस्य पुत्रस्त्वर्ककेतुर्ज्येष्ठोऽभूच्छ्रुतपारगः ॥ यौवराज्यप्रकर्ताऽसौ पितृभक्तिपरायणः ॥७॥ पुत्रवत्पालयन् राष्ट्रं शत्रूणां भयदायकः ॥ आनन्दाब्धौ सदा मग्नो दुःखमेकं स चाप्तवान् ॥८॥ एकस्मिन्नेव काले तु**

तो फारच बहुश्रुत होता. तोही राज्यकारभार पहात असून बापाच्या भक्तीत तत्पर असे. ॥७॥ शत्रूस भय देणारा असा तो राजा, पुत्राप्रमाणे प्रजेचे पालन करून नेहमी आनंदात असता त्यास एक दुःख प्राप्त झाले. ॥८॥ कोणे एके वेळी ह्याच्या राज्यात परचक्र आले; त्या शत्रूने आपला एक दूत त्याच्या सभेत





पाठविला. ॥९॥ त्या दूताने निर्भीडपणे येऊन राजास वंदन करून म्हटले, 'हे राजा, मालंब देशाचा राजा गावाबाहेर बागेत येऊन उतरला आहे ॥१०॥ त्याने सांगितले आहे की, तू एक खंडणी तरी द्यावीस अगर क्षत्रियधर्माप्रमाणे

**राष्ट्रेऽस्य परराष्ट्रभूः ॥ राजाऽऽगतोऽस्य दूतस्तु सभामभ्यागतस्तदा ॥९॥ राजानं स नमस्कृत्यं गतभीः समुवाच ह ॥ हे राजन्मालवो राजा बाह्योपवनमागतः ॥१०॥ करभारं च देहि त्वमथवा युद्धमेव वा ॥ कुरु त्वं राजधर्मेण भूपो वदति सांप्रतम् ॥११॥ श्वः काले युद्धकर्ताऽसौ चागतः सेनया सह ॥ किमुत्तरं भूप वाच्यं त्वया वाच्यं त्वरेण वै ॥१२॥ इति दूतवचः श्रुत्वा इतो गच्छ त्वमेव**

युद्ध करण्यास तयार व्हावे ॥११॥ हे राजा, तो मालवराज सैन्यासह आला असून उद्या युद्ध करण्यास तयार आहे; तरी काय उत्तर देणे असेल ते लवकर दे.' ॥१२॥ असे दूताचे बोलणे ऐकून 'तू येथून जा' असे दूतास सांगून तो

श्री स त्या म्बा

राजा रागाने मुलास म्हणाला, ॥१३॥ 'अरे मुला, तू काय करितोस? परचक्र आले आहे हे तुला माहित नाही काय? तर आता जा, आणि किती सैन्य आले आहे हे पाहून ये.' ॥१४॥ असे राजाचे भाषण ऐकून युवराज बाहेर गेला आणि शुत्रसैन्य पाहून येऊन बापास

**हि ॥ इत्थमुक्त्वा तदा दूतं क्रोधात्पुत्रमभाषत ॥१३॥ रे पुत्र किं करोषि त्वं न ज्ञातं परराष्ट्रकम् ॥ सांप्रतं गच्छ दुष्ट त्वं कति सेनां विलोकय ॥१४॥ इति रोषवचः श्रुत्वा युवराजो गतस्तदा ॥ शत्रोः सेनां विलोक्यार्थं पितरं वाक्यमब्रवीत् ॥१५॥ हे तात शृणु मे वाक्यं परराष्ट्रं विलोक्य च ॥ सेना दृष्टा मया चाद्य तुच्छा मां भाति सांप्रतम् ॥१६॥ दशलक्षं हयानां च गजानां पञ्चलक्षकम् ॥ रथानां सप्तलक्षाणि पत्तिर्विंशतिलक्षकम् ॥१७॥ एवं**

म्हणू लागला. ॥१५॥ 'अहो बाबा, माझे भाषण ऐका. मी शत्रुसैन्य पाहून आलो. मला तर ते अगदी तुच्छ वाटते. ॥१६॥ घोडे दहा लक्ष, हत्ती पाच लक्ष, रथ सात लक्ष व पायदळ वीस लक्ष आहे. ॥१७॥ हे राजा, शत्रूचे

व्र त क था



श्री स त्या म्बा

सैन्य ह्याप्रमाणे आहे; हे मी प्रत्यक्ष पाहिले. माझे सैन्य तर अगणित आहे; मी पाहून मोजून येतो.' असे म्हणून तो राजपुत्र सैन्य पहाण्यास गेला. इकडे तो राजा अंतर्गृहात जाऊन चिंताग्रस्त होऊन बसला. ॥१९॥ 'आता मी काय

**सेना वर्तमाना मया दृष्ट्वा रिपोर्नृप॥ मम सेनात्वसंख्याता दृष्ट्वाद्यगणयाम्यहम्॥१८॥ एवमुक्त्वा तदा पुत्रो गतः सेनाविलोकने॥ ततश्चान्तर्गतो राजा चिन्ताग्रस्तोऽऽभवत्तदा॥१९॥ सांप्रतं किं प्रकर्तव्यं सेनाव्यूहं न चास्ति तमे॥ भाण्डारं विपुलं नास्ति योद्धा न च समीपगः॥२०॥ किं कर्तव्यं मया चाद्य पुत्रो मूर्खोऽपि वर्तते॥ गुरुराहूयतां शीघ्रं गच्छ दूत त्वरान्वितः॥२१॥ ततो दूतस्त्वेरणैव**

करावे? मजजवळ सैन्य नाही. पैसाही पुष्कळसा नाही व जवळ योद्धेही नाहीत. ॥२०॥ आता मी काय करावे? मुलगाही मूर्खच आहे.' नंतर तो दूतास म्हणाला, 'हे दूता, तू असाच जा आणि कुलगुरुस बोलावून आण' ॥२१॥ त्याप्रमाणे दूत त्वरेने गुरूकडे गेला आणि गुरूस नमस्कार करून म्हणाला,'हे गुरो, तुम्हास राजाने त्वरित बोलाविले आहे.' ॥२२॥ असे दूताचे बोलणे ऐकून गुरु त्वरित

व्र त क था

राजाकडे आला. त्यास पाहून राजा आदराने उठून उभा राहिला. ॥२३॥ नंतर बसण्यास आसन देऊन त्याने अर्घ्यपाद्यांनी गुरूची पूजा केली. तेव्हा भक्तिभावाने युक्त झाल्यामुळे राजाच्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले.

**गुरोरग्रे गतस्तदा ॥ श्रीगुरोस्तु नमस्तुभ्यं राजाऽऽह्वयति सत्वरम् ॥२२॥ दूतवाक्छ्रवणात्सद्यश्चागतो राजसंन्निधौ ॥ देशिकं च तदा दृष्ट्वा चोत्थितस्त्वरया नृपः ॥२३॥ विष्टरं चार्घ्यपाद्यं च पूजनं कृतवांस्तदा ॥ भक्तिभावसमायुक्तः सरोमपुलकोऽभवत् ॥२४॥ ततः सगद्गदां वाणीमुवाच गुरूमञ्जसा प्रार्थयन्प्राञ्झलिर्भूत्वा प्रणतो भूमिपालकः ॥२६॥ राजोवाच ॥ नमो नमो देशिक देव तुभ्यं भवान्भवाम्भोनिधितारको हि ॥ त्वया विना संङ्कटकं**

॥२४॥ नंतर त्या राजाने गुरूस नमस्कार करून दोन्ही हात जोडून सद्गदित अंत:कणाने त्याची प्रार्थना केली. ॥२५॥ राजा म्हणाला,'हे संसाररूप समुद्रातून तारणाऱ्या कुलगुरो, तुम्हास नमस्कार असो, तुमच्यावाचून माझे संकट कोण हरण करील ? हे गुरो, माझे दु:ख नाहिसे करा ॥२६॥ कुलाचे हित करणाऱ्या हे



गुरो, माझे संकटापासून रक्षण करा. सध्या माझा प्राण जाऊ पाहात आहेत. तर हे दयासागरा, मी काय करावे हे सांगां.' ॥२७॥ राजा असे गुरूशी बोलत आहे तोच दूत येऊन म्हणाला,'हे राजा, शत्रूने गावास वेढा घातला व त्याने

**हरेत्कः प्रसीद दु:ख हर भो गुरो मे ॥२६॥ भो गुरो संकटात्त्राहिकुलानां हितकारक॥ प्राण गच्छन्ति मे सद्यः किं करोमि कृपा निधे ॥२७॥ एवं संवदतो राज्ञस्तदा दूत उवाच ह॥ ग्रामं सुलुण्ठितं तेन बद्धा पुत्रं स नीतवान् ॥२८॥ भाण्डारं लुण्ठितं तेन चाश्वशाला गताऽधुना॥ परस्य दूताः सर्वत्र गच्छन्ति राजसद्मनि॥२९॥ दूतवाक्छ्रवणाद्राजा चोक्तवान्गच्छ रे द्रुतम्॥ परराष्ट्रभयं प्राप्तं तूर्णं**

राजपुत्रास बांधून नेले ॥२८॥ त्याने द्रव्यभाण्डार (खजिना) लुटले व आपली अश्वशाळाही नेली.' शत्रूचे दूत राजवाड्यात सर्व ठिकाणी पसरले आहेत ॥२९॥ दूताचे बोलणे ऐकून राजा म्हणाला,'अरे, तू आता येथून जा.' नंतर राजा गुरूस म्हणाला, 'हे गुरो, ही परचक्राची भीति लवकरच दूर करा' ॥३०॥ तेव्हा गुरु प्रसन्नचित्त (आनंदित) होऊन राजास म्हणाले. ॥३१॥ भारद्वाज गुरु

म्हणतात, 'हे राजा, मी मोठ्या प्रयत्नाने आज तुझे संकट निवारण करितो. तूही प्रयत्न कर म्हणजे संकट आता जाईल. ॥३२॥ दुःख नाहीसे

**देशिक वारय ॥३०॥ तदा प्रसन्नहृदयो राजानं चोक्तवान्गुरुः ॥३१॥ भारद्वाज उवाच ॥संकटं चाद्य भो राजन्हरिष्यामि सुयत्नतः ॥ कुरु यत्नमतस्त्वं हि संकटं गतमद्य ते ॥३२॥ व्रतमस्तीह फलदं दुःखहं च सुखप्रदम् ॥ तद्व्रताचरणेनैव ॥ दुःखं दुरे कृतं मया ॥३३॥ कुरु धैर्य मतस्त्वं हि तद्वादाम्यविशिंकया ॥ शीघ्रं फलानि चाद्यैव कुरु यत्नं त्वरान्वितः ॥३४॥ राजोवाच ॥ भो गुरो वद शीघ्रं त्वं विधिं च फलदं ॥ यतः करोमि**

करून सुख देणारे व उत्तम फळ देणारे असे (एक) व्रत आहे ते व्रत करूनच मी दुःख नाहीसे केले म्हणून समज ॥३३॥ तू धैर्य धर. मी तुला ते व्रत काही शंका न धरिता सांगतो. त्यापासून त्वरित फळे मिळतात. म्हणून तू ते लवकर कर' ॥३४॥ राजा म्हणाला, 'हे गुरो, जर ते (व्रत) फलदायक आहे, तर त्याचा विधि मला लवकर सांगा. हे गुरो, तुम्ही जे सांगाल ते



सर्व मी शंका न धरिता करीन' ॥३५॥ त्यावर गुरु म्हणाले, 'हे राजा, उत्तम सिद्धि देणारे असे सत्यांबा व्रत तू लवकर कर. म्हणजे शत्रु गावाबाहेर पळून जाईल. ॥३६॥ नंतर वक्त्यामध्ये श्रेष्ठ अशा भारद्वाज गुरूने व्रताचा विधि राजास सांगितला आणि ते म्हणाले,

**शंकारहितः सर्वं वाच्यं यतः प्रभो ॥३५॥ गुरुरुवाच ॥ त्वं सत्यांबाव्रतं राजन्कुरु सद्यः फलप्रदम् ॥ त्वरा कार्या प्रयत्नेन शत्रुर्ग्रामाद्गमिष्यति ॥३६॥ ततो व्रतविधिं यत्नात्प्रोवाच वदतां वरः॥ मयोक्तं तु त्वया कार्यं फलं ग्राह्यं च सत्वरम् ॥३७॥ गुरुणोक्तस्तदा राजा कृतवान्भक्तितत्परः॥ पुरोधसं पुरस्कृत्य कथां श्रुत्वैकमानसः।-।३८॥ब्राह्मणेभ्यो धनं दत्तं दीनानां भोजनं तथा॥**

'मी सांगितले ते तू लवकर कर व फळ मिळवः ॥३७॥ नंतर भक्तितत्पर राजाने गुरूने सांगितल्याप्रमाणे व्रत केले व उपाध्यायाकडून एकाग्र अंतःकरणाने कथा श्रवण केली. ॥३८॥ नंतर ब्राह्मणास दक्षिणा दिली व गरिबास भोजन घातले आणि सर्वांस प्रसाद देऊन नंतर स्वतःही प्रसाद घेतला. ॥३९॥ कथा

श्रवण करण्यास जे लोक आले होते, त्यांनी जगदंबेस नमस्कार करून पौराणिक ब्राह्मणास यथाशक्ति दक्षिणा दिली. ॥४०॥ पालखी, मेणे, घोडे, हत्ती, गांवे, वस्त्रे, अलंकार, जहागीर, भूमि व असेच अनेक प्रकारचे धन

**सर्वेभ्यश्च प्रसादं वै दत्त्वा गुह्णात्स्वयं ततः ॥३९॥ श्रवणे ये गता लोकास्ते नत्वा जगदम्बिकाम् ॥पौराणिकाय विप्राय ददुःशक्त्या धनं बहु ॥४०॥ शिबिकाश्वगजग्रामवस्त्राभरणमेव च । धनं बहुतरं भूमिं नियतां दत्तवान् नृपः ॥४१॥ आकाशाद्वाक्तदा जाता भो राजन्सुस्थिरो भव ॥ भक्त्या व्रतं कृतं यस्मात्तस्माच्छत्रुर्गमिष्यति ॥४२॥ तदा चु ब्राह्मणैः सर्वैराशीर्दत्त फलप्रदा ॥ व्रताचरण-**

राजाने उपाध्यायास दिले. ॥४१॥ नंतर आकाशवाणी झाली की,'हे राजा, अगदी स्वस्थ राहा. तू भक्तीने व्रत केलें म्हणून आता तुझे शत्रु निघून जातील.' ॥४२॥ तेव्हा सर्व ब्राह्मणांनी राजास आशीर्वाद दिला. सूत म्हणतात - 'हे, शौनकादिक ऋषींनो, नुसत्या व्रताचरणानेच राजाचे दुःख नाहिंसे झाले. ॥४३॥





तेव्हा एकाएकी शत्रूच्या छावणीत गलबला झाला. 'हे दूतांनो, धरा, बांधा, मारा, लक्ष्य द्या.' (ह्याप्रमाणे शिपाई बोलू लागला.) ॥४४॥ असे ऐकून सर्व वीर हातात शस्त्रें घेऊन उठले आणि शत्रूच्या छावणीत आले;

**मात्रेण राजदुःखं गतं द्विजाः ॥४३॥ तदा कोलाहलो जातो ह्यकस्माच्छिबिरे परे ॥ ध्रियतां बध्यतां हन्या दूता हो लक्ष्यतामिति ॥४४॥ इत्येवं श्रवणाद्वीरा उत्थिताः शस्त्रपाणयः ॥ शत्रोश्च शिबिरं प्राप्ता राज्ञः पुत्रास्तु निर्भयाः ॥४५॥ पुरा निष्कासितस्तेन बद्धा ये चावमोचनात् ॥ बन्धमुक्ताश्च ते योध्दुमुत्थिताः शस्त्रपाणयः ॥४६॥ तदा शस्त्राणि चास्त्राणि गजाश्वरथभूषणम् ॥**

तेव्हा बंदिवान राजपुत्राची भीति कमी झाली. ॥४५॥ सत्याम्बाव्रत करण्यापूर्वी राजाच्या छावणीतून त्या शत्रूराजाने जे योद्धे शिपाई धरून बांधून नेले होते. ते सर्व योद्धे बंधनापासून मुक्त झाले आणि हातात शस्त्रें घेऊन त्या शत्रूराजाच्या सैन्याबरोबर निकराने युद्ध करावयास उठले. ॥४६॥ तेव्हा शत्रूसैन्याने अस्त्रे, घोडे,

रथ, अलंकार वगैरे सर्व टाकून चोराप्रमाणे पळण्यास आरंभ केला. ॥४७॥ तेव्हाच मालव राजा घोड्यावर बसून पळू लागला. तेव्हा ह्या राजाकडच्या योद्ध्यांनी त्याला मोठ्या प्रयत्नाने घोड्यासुद्धा

त्यक्त्वैव चोरवत्सर्वे पलायनमकुर्वत ॥४७॥ तत्रैव मालवो राजा त्वश्वारूढो विनिर्गतः ॥ भटैः स च तदा दृष्टः साश्वो बद्धः प्रयत्नतः ॥४८॥ मर्कटस्तु यथा बद्धस्तथा नीतो गुणेन वै ॥ राज्ञा दृष्टास्तदा राजा मुच्यतामिति चाब्रवीत् ॥४९॥ कृत्वाधोवदनं राजा मालवः प्रणतिं व्यधात् ॥ तदा तं पृष्टवान् राजा पुत्राः कुशलास्तव

धरुन बांधिले ॥४८॥ व ज्याप्रमाणे माकडास दोरीने बांधून नेतात, त्याप्रमाणें त्यास बांधून नेऊ लागले. सूर्यकेतु राजाने ते पाहिल्यावर त्यास सोडण्यास सांगितले. ॥४९॥ मालव राजा खाली तोण्ड घालून नमस्कार करून उभा राहिला. तेव्हा सूर्यकेतूने त्यास असे विचारले 'तुझी मुले कुशल आहेत ना ? ॥५०॥ तुझ्या





देशात सांप्रत स्वस्थता आहे ना ? सांग.' मालव राजा म्हणाला, 'हे राजा, मी तुझा फार अपराधी आहे. आता मजवर दया कर. ॥५१॥ मीं माझी सुलोचना कन्या तुझ्या पुत्रास दिली (असे समज) असे म्हणून त्याने आपली मुलगी

॥५०॥ देशे हि स्वस्थता नित्यं वर्तते वद सांप्रतम् ॥ मालव उवाच ॥ राजंस्ते ह्यपराध्यस्मि कृपा कार्या त्वयाधुना ॥५१॥ मत्कन्या वै विशालाक्षी तव पुत्राय चार्पिता ॥ इत्युक्त्वा च तदा तेन साऽऽनीता च समर्पिता ॥५२॥ कन्यादानविधानेन कृतं वैभवपूर्वकम् ॥ धनं बहुतरं दत्तं संतुष्टो भूमिपस्तदा ॥५३॥ भटैर्गृहीतं यद्यच्च तत्तस्मै दत्तवानसौ ॥ - मालवो बहुहर्षाद्वै सैनिकैःसह जग्मिवान् ॥५४॥ राजा

आणून सूर्यकेतूचे स्वाधीन केली.॥५२॥ आणि आपल्या वैभवाप्रमाणे कन्यादानाचा समारंभ करून पुष्कळ- धनही दिले. तेव्हा सूर्यकेतू राजा अतिशय संतुष्ट झाला.॥५३॥ योद्ध्यांनीही जे जे घेतले होते ते ते सर्व त्या सूर्यकेतु राजास त्या मालव राजाने दिले आणि मग तो मालव राजा मोठ्या आनंदाने सैन्यासुद्धा निघून गेला. ॥५४॥ त्या दिवसापासून तो सूर्यकेतू राजा, इष्ट फळ देणारे असे

श्री सत्याम्बा व्रतकथा

हे व्रत प्रतिमासीं (दर महिन्यास) करू लागला. ॥५५॥

**तद्दिनमारभ्य मासि मासि व्रतं सदा ॥ कृतवान्भक्तिभावेन सत्याम्बाऽभीष्टदा यतः ॥५५॥ अतः सर्वप्रयत्नेन एकत्कार्य हि सर्वदा ॥ एतस्य करणादुःखहानिः सौख्यं प्रजायते ॥५६॥**

म्हणून हे व्रत मोठे श्रम पडले तरी नेहमी करीत जावे. यामुळे दुःख नाहीसे होऊन सुख प्राप्त होते ॥५६॥

॥इति श्रीभविष्योत्तरपुराणे शिवषण्मुखसंवादे श्रीसत्यांबाव्रतकथायां तृतीयोऽध्यायः ॥३॥

---





गुप्त झाली. नंतर राजाने पहाटेस उठल्यावर प्रातःस्मरण करून ब्रह्मचिंतन केले

**तामेष नो चेत्वां नाशयाम्यहम् ॥३३॥ स्वप्नमध्ये तु राजानमित्युक्त्वान्तरधीयत ॥ अथ प्रभाते राजा वै स्मृत्वा ब्रह्म सनातनम् ॥३४॥ स्वर्गादिकं ततः स्मृत्वा शौचं कृत्वा विधानतः ॥ सभामध्ये ययौ राजा स्वासने संस्थितस्तदा ॥३५॥ दूतानाज्ञापयामास सूर्यकेतुस्त्वरान्वितः ॥ रे दूता निगडाद्यूयं गुण्डमानीय**

॥३४॥ नंतर स्वशरीरांत चतुर्दशभुवनात्मक विराट् पुरूषाचें चिंतन करून स्वर्गादिकलोकांचे चिंतन केले. नंतर यथाविधि देहशुद्धि व स्नानसंध्यादि - विधि आचरून राजा सभेमध्ये येऊन आपल्या सिंहासनावर बसला ॥३२॥ आणि त्या सूर्यकेतु राजाने लागलेच आपले दूतांस आज्ञा केली की, 'दूतांनो, कारागृहामध्ये 'गुंड' या नांवाचा शूद्र, त्याची स्त्री आणि पुत्र यासह कैद केलेला आहे. त्यास (सोडवून) लवकर

इकडे आणा ॥३६॥ आणि त्यांच्या बेड्या सोडा' याप्रमाणे दूतांस आज्ञा होतांच



सत्वरम् ॥३६॥ शृङ्खलामोचनं कार्यमित्युक्तैस्तैस्तथा कृतम् ॥
सपत्नीकं सपुत्रं च स्नापयित्वा यथाविधि ॥३७॥ वस्त्राद्याभरणैः
सद्यस्तोषयामास तान्प्रति ॥ स्वाद्वन्नैर्भोजयित्वाथ शूद्रं पप्रच्छ
वै नृपः ॥३८॥ किमर्थं वां दशा ह्येषा तव जातेदृशी
वद ॥ इति भूपवचः श्रुत्वा शूद्रः प्रोवाच दुःखितः ॥३९॥
मदोन्मत्तेन हि मया विस्मृतं त्वम्बिकाव्रतम् ॥ तेन

त्यांनीं त्या गुंड शूद्रास स्त्रीपुत्रांसह कैदेंतून मुक्त केलें व त्यांस यथाविधि मंगलस्नान घातले. ॥३६॥ वस्त्र, अलंकार देऊन ताबडतोब संतुष्ट केले आणि स्वादिष्ट अन्नाने त्यांस भोजन घातलें. भोजन झाल्यावर राजाने त्या शूद्रास प्रश्न केला. ॥३८॥ 'हे गुंडा, तुझी ही अशी दशा का झाली ते सांग.' राजाचे हे भाषण श्रवण करून तो शूद्र दुःखित होऊन म्हणाला ॥३९॥ हे राजा, संसाराच्या भरात मी मदोन्मत्त झालो; त्यामुळे पूर्वी नवस केलेल्या सत्यांबाव्रताचे मला





विस्मरण झाले. त्या माझ्या कर्मामुळे मी या दशेप्रत पावलो आहे, ॥४०॥ हे राजा, आज मी आपणास शरण आलो आहे; तर आपणास वाटेल

चास्मि दशामेतां गमितः स्वेन कर्मणा ॥४०॥ अद्य त्वां शरणं
यातो यथेच्छसि तथा कुरू ॥ इति तस्य वचः श्रुत्वा संतुष्टो
भूमिपस्तदा ॥४१॥ तस्यानीतं च यद्द्रव्यं तस्मै दत्तं विशेषतः ॥
द्विगुणीकृत्य चोवाच गतं दुःखं तवाधुना ॥४२॥ मणिधरात्कन्यकाऽऽ-
नीता तस्य शिक्षा कृता तदा ॥ तत्पित्रा विधिना दत्ता पुत्रायास्य
त्वरोगिणे ॥४३॥ ततस्तद्दिनमारभ्य सत्याम्बाव्रतमाचरत् ॥ स शूद्रोऽन्ते

तसें करा.' असें त्या गुंडाचें भाषण ऐकून राजा संतुष्ट झाला; ॥४१॥ आणि त्यानें जें द्रव्य आणिलें होतें त्याच्या दुप्पट त्यास दिलें, आणि म्हणाला, 'आतां तुझें दुःख गेलें.' ॥४२॥ नंतर मणिधरापासून ती मुलगी आणिली, व त्यास त्यावेळी शिक्षा दिली. तिच्या बापानें पुन्हा गुंडाच्या निरोगी 'पुत्रास विधिपूर्वक

ती मुलगी अर्पण केली. ॥४३॥ त्या दिवसापासून तो शूद्र हें सत्यांबाव्रत करूं लागला व ह्याच्या प्रभावानें शेवटीं तो सत्यांबालोकांस गेला. ॥४४॥ सूत

तत्प्रभावात्सत्याम्बालोकमाप्तवान् ॥४४॥ सूत उवाच ॥ एतत्सत्याव्रतं विप्रा भवद्भिश्च श्रुतं यतः ॥ महाकष्टस्य हरणमर्थदं पुत्रदं भुवि ॥४५॥ एतत्फलति वै सद्यौ दुःखदारिद्रचनाशनम् ॥ भुक्तिदं मुक्तिदं चान्ते सत्यालोकप्रदायकम् ॥४६॥ अतः सर्वजनैः कार्यकार्यारम्भे फलप्रदम् ॥ संग्रामे विजये वादे संकटे भय आगते ॥४७॥ यद्यत्प्राप्तं यदा दुःखं तदा कार्यं सुभक्तितः ॥ व्रतानां चैव सर्वेषां फलदं भुवि

म्हणाले - 'अहो ब्राह्मणांनो, तुम्हीं श्रवण केलेलें हें सत्यांबाव्रत ह्या लोकीं मोठें संकट हरण करणारें आणि पुत्र व धन देणारें आहे, ॥४५॥ तसेच हे शीघ्र फल देणारें व दारिद्रय आणि दुःख ह्यांचा नाश करणारें आणि मुक्ती देणारें असून शेवटीं सत्यांबालोकास नेणारें आहे. ॥४६॥ म्हणून सर्व लोकांनी हें सत्यांबाव्रत, कोणत्याही कार्याचे आरंभी करावें; म्हणजे तें कार्य सिद्धीस जातें, लढाईत व वादविवादांत जय मिळण्याचे वेळीं किंवा संकट व भय उत्पन्न हाईल, ॥४७॥ अगर जेव्हां दुःख प्राप्त होईल, त्या त्या वेळीं हें मोठ्या भक्तीनें



मुक्तिदम् ॥४८॥ दीनानां कृपया ह्यत्र शम्भुना प्रकटीकृतम् ॥ श्रवणादेव सर्वं स्याद व्रताचरणसत्फलम् ॥४९॥

करावें. सर्व व्रतांमध्यें हें फळ देणारें व मुक्ति देणारें असें उत्तम व्रत आहे. ॥४८॥ गरीबांवर दया करण्याकरितां शंकरानें हे व्रत प्रसिद्ध केलें आहे. ह्या व्रताची कथा नुसती श्रवण करण्यानें देखील व्रत करण्याचें फळ मिळतें. ॥४९॥

॥इति श्रीभविष्योत्तरपुराणे शिवषण्मुखसंवादे सत्यांबाव्रतकथायां चतुर्थोऽध्यायः ॥४॥

श्रीसत्याम्बार्पणमस्तु ॥ जय जय जगदम्बा समर्थ ॥ उदयोऽस्तु ।

उदयोस्तु । उदयोस्तु । श्रीः ॥ श्रीः ॥ श्रीः ॥

स मा प्त

**श्री सत्याम्बा व्रतकथा**

**प्रकाशक :-**
अतुल रविंद्र खोपकर
अक्षयविद्या प्रकाशन
विद्यार्थी प्रकाशन
श्री व्यंकटेश अपार्टमेंट, १७०/अ/३,
पर्वती, पुणे - ४११ ००९.
फोन नं. २४२१९०१७, मो. नं. ९४२२३६३५४५

For Hariom Astrologers
Proprietor

**सर्व हक्क प्रकाशकांकडे**

**सुधारीत आवृत्ती :**
श्री दत्तात्रेय जयंती
१५ डिसेंबर २००५

**मुद्रक :-**
मुद्रारेखा
८३, शिवाजीनगर ,
रासने इंडस्ट्रीयल इस्टेट,पुणे -५

## आमची लोकप्रिय धार्मिक प्रकाशने

### वि.के. फडके
- श्री गणेश उपासना कशी कराल?
- (संकटनिवारक)श्रीहनुमान उपासना
- श्रीरामविजय कथासार
- (ईश्वर प्राप्तीसाठी) नामसाधना अशी करा
- श्री नवनाथांच्या गोष्टी
- श्रीसत्याम्बा व्रतकथा
- वास्तुशास्त्र ( समज व गैरसमज )
- शनिपीडा ( प्रभावी उपाय )
- सुखी जीवनासाठी सोप्या उपासना
- श्री दत्त उपासना अशी करा !
- शुभं करोती ( नित्य वाचनासाठी)
- रहस्य आरोग्याचे (औषधे व दैवी उपाय)

### आचार्य. डॉ. मधुसुदन घाणेकर
- वैवाहिक जीवनात अडथळे आणणारे ग्रहमान
- कालसर्पयोग रहस्य समज व गैरसमज
- श्री कालभैरव उपासना

### मो.द. खेर
- सार्थ श्री हनुमान वडवनाल स्तोत्र
- सार्थ श्री रामरक्षा (पॉकेट)

### चिंतामणी देशपांडे
- मंत्र, तंत्र, यंत्र प्रभावी तोडगे

### पंडीत कृष्णकांत नाईक
- श्री दुर्गादेवी उपसाना
- तुमचे भविष्य तुमच्या हाती
- देवपूजेतील शुभकारक साधने आणि २१ वनस्पती पत्रींचे महत्त्व
- अनमोल भाग्यरत्ने व रुद्राक्ष
- सार्थ हरिपाठ आणि निरुपण
- बारा महिन्यांचे उपवास व व्रते
- श्री यंत्र आणि मंत्र रहस्य
- गायत्री मंत्राचे रहस्य होणारे लाभ
- धर्मशास्त्रकारांनी सांगितली शास्त्रोक्त विधीपूर्वक देवपूजा
- जन्मकुंडलीवरून आपले भविष्य आपणच पाहा (जे घडे न टळे)
- सार्थ गायत्री मंत्र (पॉकेट साईज)
- नवसाला पावणाऱ्या महाराष्ट्रातील कुलस्वामिनी
- श्री गुरुदेव दत्त महिमा
- सार्थ आरती संग्रह
- मानसिक आणि शारिरीक लाभ देणारा व्यायाम सूर्यनमस्कार
- भगवद्‌गीतेचे सारांशरुपी कथासार
- श्री साईबाबांची अद्‌भुत चरित्र गाथा
- श्री तुकाराम महाराजांची अंभगवाणी
- प्रश्न तुमचे उत्तर आमचे
- श्री स्वामी समर्थ अवतरले कलीयुगी

**अक्षयविद्या प्रकाशन**
श्री व्यंकटेश अपार्टमेंट, १७० पर्वती, पुणे

Astro • Puja • Vastu

# FALIT JYOTISH AND VASTU SHASTRA CONSULTANT

## FOR ALL DHARMIK POOJA'S

SHRI GANESH PUJA

SHRI SATYANARAYAN PUJA

VASTU SHANTI

WEDDING | SAKHARPUDA | MUNJ

JANANA SHANTI | RUDRABHISHEK

SAPTASHATI PATH | HAVAN | ETC.

## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

**SANPADA OFFICE**
Office No. 8, 1st Floor, Shiva Triveni Galleria CHS., Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai - 400705.

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai - 400043.

YouTube: hariom astrologers
Facebook: hariom astrologers
Instagram: hariom_astrologers
hariomastrologers@gmail.com
www.hariomastrologers.com